प्रकरण पहिले

प्रबंधाचा विषय, व्याप्ती व मर्यादा :

' रंगभूमी नियतकालिकातील नाट्यसमीक्षा - एक चिकित्सक अभ्यास ' हा प्रस्तुत प्रबंधाचा विषय आहे. रंगभूमी नियतकालिकाचे अंक वाचत असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की फक्त नाटक या एकाच विषयाशी संबधित असे नियतकालिक १९०७ साली सुरू करणे, ते चालवणे ही गोष्ट त्या काळाच्या संर्दभात फारच मोलाची आहे. आज मराठी रंगभूमी कितीतरी प्रगत आहे. तिचा सर्वागांनी विकास झालेला आहे, होतो आहे. नाटक एक कला आणि व्यवसाय या दोन्ही दृष्टीने तिचा व्याप आज खूप मोठा आहे. प्रायोगिक रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमी, कामगार रंगभूमी, दलित रंगभूमी अशा भिन्न भिन्न प्रकारच्या रंगभूमीवर नाट्यप्रयोग होत आहेत. विविध पातळ्यांवर नाट्यस्पर्धा होत आहेत. सरकारी, बिनसरकारी नाट्यपारितोषिके दिली जात आहेत. नाट्यसंमेलने, मेळावे परिषदा यातून नाट्यचर्चा, परिसंवाद होत आहेत. वेगवेगळ्या स्तरांवर नाट्यसमीक्षा होते आहे. प्रेक्षकवर्ग चोखंदळ बनला आहे. असे सगळे वातावरण असूनही नाटक याच एका विषयासाठी मराठीत सातत्याने चालणारे एकही नियतकालिक नाही. सर्व दृष्टीने अनुकूल काळ असूनही जे आज घडू शकत नाही ते प्रतिकूल परिस्थितीत श्री. शंकरराव मुजुमदार यांनी करून दाखविलेले आहे. जसजसे मी अंक वाचत गेले तसतसे त्यामागील ध्येयवाद, तळमळ, विषयाचा व्याप वा गोष्टी ध्यानात येत गेल्या. मागणी तसा पुरवठा या पध्दतीने हे नियतकालिक जन्माला आलेले नाही तर त्यामागे काही मूलभूत विचार आहेत, दूरदृष्टी आहे, ध्येयधोरण आहे याचेही आकलन होत गेले. रंगभूमीतील लेखांचे वर्गीकरण करीत गेल्यावर या नियतकालिकाचा विस्तृत आलोक अधिकाधिक ध्यानात आला. विविध पैलू असलेल्या लेखांपैकी नाट्यविषयक चिंतनपर लेख आणि मराठी, संस्कृत, इंग्रजी नाटकांवरील परीक्षणलेख विशेष लक्षवेधी, महत्वपूर्ण वाटले. या नियतकालिकातील नाट्यविषयक लेखांमध्ये, नाटक या वाङ्मय प्रकाराविषयी, त्याच्या प्रकृतिधर्माविषयी सखोल चिंतन आहे, त्याचप्रमाणे कलादृष्ट्या रसग्रहणे आहेत म्हणजे नाटक या कलाबंधातील मूलस्त्रोतांचा

तात्विक विचार, त्यातील सदैव चैतन्यदायी घटकांचा शोध, नाट्यकला आणि समाजमन यांच्यातील नातेसंबंध हे सारे वैचारिक पातळीवर, तर्कशुध्द रीतीने तपासून पाहण्याचा दृष्टिकोन या लेखांमध्ये दिसतो. त्याचप्रमाणे रसग्रहण, समीक्षणांमधून नाट्याभिव्यक्तीतील उच्च-नीचता कलादृष्ट्या पारखून घेण्याचाही समर्थ प्रयत्न दिसतो. प्रत्यक्ष साहित्यकृतींचे कलादृष्टया विश्लेषण आणि एखाद्या रूपबंधातील मूलतत्त्वे या दोन्हीचा अभ्यास हा त्या कलाप्रकाराच्या गाभ्याकडे नेणारा अभ्यास असतो. यातूनच ऐतिहासिक दृष्टी तयार होते. त्या कलाप्रकारातील चिरस्थायी मूल्यांचे भान येते म्हणूनच 'रंगभूमी नियतकालिकातील नाट्यसमीक्षा - एक चिकित्सक अभ्यास' हे प्रबंधलेखनाचे क्षेत्र मी निश्चित केले. नाट्यविषयक चिंतनपर, माहितीपर लेख आणि नाटकांवरील परीक्षण लेख या दोन्ही प्रकारच्या लेखांचा परामर्ष, प्राधान्याने प्रस्तुत प्रबंधात घेतला आहे. नाटकांच्या परीक्षण लेखांवर लिहिताना त्यात निवड केलेली आहे. मराठी, संस्कृत, इंग्रजी नाटकांवरील सर्वच परीक्षण लेखांचा विस्तृत परामर्ष घेतलेला नाही. त्या त्या लेखांचा विशिष्ट दर्जा, त्यातील विचारांचे महत्त्व लक्षात घेऊन ही निवड केलेली आहे. इंग्रजी नाटकांवरील परीक्षणलेखांचा धावता आढावा घेतलेला आहे. नाट्यविषयक चिंतनपर, माहितीपर लेखापैकीसुद्धा अतिशय महत्त्वाच्या वाटलेल्या लेखांची चर्चा केली आहे.

रंगभूमी नियतकालिकाच्या अंकांची उपलब्धी –

रंगभूमी नियतकालिकाचे सर्व अंक महाराष्टातील प्रत्येक महत्त्वाच्या ग्रंथालयात अभ्यासासाठी उपलब्ध असायला हवेत अशा योग्यतेचे आहेत. परंतु आज मूळ स्वरूपात एक्क्याणव अंक मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय नायगाव दादर, मुंबई येथे उपलब्ध आहेत. तेथील आत्ताच जीर्ण होऊ लागलेल्या या अंकांच्या झेरॉक्स प्रती काढण्याची निकड निर्माण झाली आहे आणि ते काम N.C.P.A. (मुंबई) च्या ग्रंथालयाने केलेलेही आहे. या ग्रंथालयात रंगभूमी नियतकालिकाचे सर्व अंक झेरॉक्स स्वरूपात उपलब्ध आहेत. इतर नियतकालिकातील लेखांच्या विषयवार वर्गीकरणात रंगभूमीतील लेखांचे वर्गीकरणही जतन करून ठेवलेले आहे. हे काम अगदी अलीकडच्या काळात झालेले आहे. रंगभूमीचे अंक उपलब्ध असलेल्या ग्रंथालयांची माहिती 'मराठी नियतकालिकांची सूची १८०० ते १९५० द्वितीय खंड, भाग ५' मध्ये दिलेली आहे.

रंगभूमी नियतकालिकाचे बाह्यरूप आणि अंकांच्या प्रसिध्दीचा तपशील –

रंगभूमी नियतकालिक हे मराठीतील, केवळ नाट्यविषयाला वाहिलेले पहिले सचित्र नियतकालिक होते. किर्लोस्कर नाटकमंडळीचे व्यवस्थापक श्री. शंकरराव बापूजी मुजुमदार हे रंगभूमीचे संपादक होते. त्याना काही काळ राम गणेश गडकरी यांनी संपादन साहाय्य केलेले होते. मात्र साहाय्यक संपादक म्हणून राम गणेश गडकरी यांचे नाव रंगभूमी नियतकालिकावर कोठेही छापलेले नाही. त्या काळात तशी प्रथा नव्हती.

रंगभूमी नियतकालिकाचा पहिला अंक ऑगस्ट एकोणीसशे सात मध्ये निघाला [१] या पहिल्या अंकात वाचकांना अठ्ठेचाळीस पृष्ठांचा मजकूर दिलेला आहे. या अंकाचा आकार १३० मि. मि. X १७५ मि. मि. असा आहे. ऑगस्ट ते जुलै असे रंगभूमी नियतकालिकाचे वर्ष मोजलेले असून त्यानुसार ऑगस्ट १९०७ ते जुलै १९१० या तीन वर्षात नियमितपणे छत्तीस अंक वाचकांना दिलेले आहेत. त्यानंतर मात्र अनियमितपणा आलेला दिसतो. रंगभूमी नियतकालिकाचे प्रसिद्ध झालेले आणि आज उपलब्ध असलेले अंक खालीलप्रमाणे आहेत.

वर्ष १ ले	अंक १ ला	ऑगस्ट १९०७.
	अंक २ व ३	सप्टें-ऑक्टो १९०७
	अंक ४	नोव्हे. १९०७
	अंक ५ व ६	डिसें-जाने १९०७ व १९०८
	अंक ७ वा	फेब्रु. १९०८
	अंक ८ व ९	मार्च -एप्रिल १९०८
	अंक १० वा	मे १९०८
	अंक ११ वा	जून १९०८
	अंक १२ वा	जुलै १९०८

वर्ष १ ले एकूण अंक १२

वर्ष २ रे	अंक १ ला	ऑगस्ट	१९०८
	अंक २ रा	सप्टें.	१९०८
	अंक ३ रा	ऑक्टो	१९०८
	अंक ४ था	नोव्हें.	१९०८
	अंक ५/६/७	डिसें. १९०८, जाने, फेब्रु.	१९०९
	अंक ८/९/१०	मार्च, एप्रिल, मे	१९०९
	अंक ११/१२	जून, जुलै	१९०९
			वर्ष २ रे एकूण अंक १२
वर्ष ३ रे	अंक १ ला	ऑगस्ट	१९०९
	अंक २/३	सप्टें, ऑक्टो.	१९०९
	अंक ४/५	नोव्हें, डिसें	१९०९
	अंक ६/७	जाने, फेब्रु	१९१०
	अंक ८/९	मार्च, एप्रिल	१९१०
	अंक १०	मे	१९१०
	अंक ११	जून	१९१०
	अंक १२	जुलै	१९१०
			वर्ष ३ रे एकूण अंक १२
वर्ष ४ थे	अंक १	जाने	१९११
	अंक २	फेब्रु	१९११
	अंक ३	मार्च	१९११
	अंक ४	एप्रिल	१९११
	अंक ५	मे	१९११
	अंक ६	जून	१९११
	अंक ७/८/९/१०	जुलै ते ऑक्टो.	१९११
	अंक ११	नोव्हें	१९११
	अंक १२	डिसें	१९११
			वर्ष ४ थे एकूण अंक १२

वर्ष ५ वे	अंक १	मे	१९१२
	अंक २	जून	१९१२
	अंक ३	जुलै	१९१२
	अंक ४	ऑक्टो	१९१२
	अंक ५/६	डिसें	१९१२
	अंक ७	जून	१९१३
	अंक ८	जुलै	१९१३
	अंक ९	ऑगस्ट	१९१३
	अंक १०/११	डिसें	१९१३
	अंक १२	मार्च	१९१४
			वर्ष ५ वे एकूण अंक १२
वर्ष ६ वे	अंक १	२५ मे	१९१४
	अंक २	२१ जुलै	१९१४
	अंक ३	१ सप्टें	१९१४
	अंक ४	१ नोव्हें	१९१४
	अंक ५	१५ मार्च	१९१५
	अंक ६	२८ जून	१९१५
	अंक ७	१ डिसें.	१९१५
	अंक ८		१९१६
	अंक ९		१९१६
	अंक १०		१९१६
	अंक ११/१२		१९१६
			वर्ष ६ वे एकूण अंक १२
वर्ष ७ वे	अंक १/२		
	अंक ३/४		
	अंक ५/६/७		
			वर्ष ७ वे एकूण अंक ०७

रंगभूमी नवी आवृत्ती

अंक १	एप्रिल	१९२७
अंक २	मे	१९२७
अंक ३	जून	१९२७
अंक ४/५	जुलै, ऑगस्ट	१९२७
अंक ६	सप्टें	१९२७
अंक ७/८/९	ऑक्टो, नोव्हें, डिसें.	१९२७
अंक १०	जाने.	१९२८
अंक ११/१२	फेब्रु., मार्च	१९२८

नवी आवृत्ती एकूण अंक १२

रंगभूमी नियतकालिकाचे एकूण ९१ अंक निघाले. ऑगस्ट १९१० ते डिसें १९१० या काळात, तसेच जाने १९१२ ते एप्रिल १९१२ या काळात अंक निघालेले नाहीत. वर्ष ५ व ६ मध्येही अनियमित प्रकाशन आहे. वर्ष ५ मध्ये ८ मे १९१२ ते २७ मार्च १९१४ या दरम्यान अंक प्रकाशित झाले आहेत. वर्ष ६ मध्ये १९१४ ते १९१६ या दरम्यान अनियमित प्रकाशन आहे. सातव्या वर्षात सातच अंक निघालेले आहेत व त्या अंकावर वर्ष, महिना असा कोणताही उल्लेख नाही. म्हणजे १९१६ नंतर सालाचा उल्लेख सापडतो एकदम १९२७ च्या नव्या आवृत्तीवरच. पहिल्या वर्षापासूनच रंगभूमी नियतकालिकाचे जोड अंक निघालेले आहेत.

रंगभूमी नियतकालिकाच्या प्रथमांकाचा परिचय –

रंगभूमी नियतकालिकाच्या स्वरूपाची कल्पना येण्यासाठी पहिल्या अंकाचे तपशीलवार स्वरूप देणे इष्ट वाटते.

पहिल्या अंकाच्या आपल्या संपादकीयात श्री शं.बा. मुजुमदार म्हणतात – ‘रंगभूमी’चा हा पहिला अंक प्रसिध्द होत आहे. रंगभूमीवर प्रयोगरूपाने अवतीर्ण होणाऱ्या नाटकांच्या अंकातील शेवटच्या अंकाची जिज्ञासेने व आतुरतेने वाट पाहात असतात हे

स्वाभाविकच आहे. परंतु ही स्वाभाविकता या ‘रंगभूमी’च्या अंकासही लागू पडेल व लोकांना तिच्या शेवटच्या अंकाची वाट पाहण्याची इच्छा न होइल अशा विषयी खबरदारी तिच्या चालकांपेक्षा पालकांकडेसच विशेष आहे.नाट्यकलेच्या अभ्युदयाविषयी चिंतन चाललेलें चोंहीकडे पाहण्यात येतें. परंतु ते उद्‌गाररूपाने बाहेर पडण्याचे साधन कांहीअंशी द्रव्याभावामुळें व कांही अंशी सध्या दिसत असलेल्या महाराष्ट्रवाङ्‌मयाबद्‌दलच्या अनास्थेमुळे आजपर्यंत लुप्तप्रायच असे. आज ‘रंगभूमी’ या नांवाने ते साधन कांही अंशी दृग्गोचर होत आहे याला कारण केवळ नाट्यकलेच्या विषयी लोकांची ही लुप्त सदिच्छाच होय. ती जोपर्यंत वाढत्या प्रमाणावर - किंवा निदान आहे इतकीच असेल तोपर्यंत या पुस्तकाच्या अस्तित्वाबद्‌दल फारशी शंका घेण्याचे कारण दिसत नाही. पुस्तकाचे हेतू व उद्‌देश ज्या विद□ गृहस्थांनी प्रस्तावरूपाने आपले विचार प्रकट केले आहेत त्यांच्या त्या विचाराला अनुसरूनच आहेत. अशा विद□ंचे विचार वारंवार वाचावयास मिळतील अशी व्यवस्था केली आहे.’

यानंतर पुस्तकाच्या एकंदर व्यवस्थेसंबंधी ठरविलेले नियम दिले आहेत ते असे-

१ प्रत्येक अंकात प्रत्येक विषय होता होईल तो पूर्ण देण्यात येइल.

२ जे विषय भागश: येत जातील त्यांचे स्वतंत्र पृष्ठांक देण्यात येतील, त्यायोगाने आहेत.

३ प्रत्येक विषयाचे स्वतंत्र पुस्तक बांधिता येईल.

४ नाट्यविषयक चर्चा अधिकाधिक होत जावी हाच या मासिक पुस्तकाचा हेतू असल्यामुळे कोणाही तज्ञ लेखकांच्या लेखांना स्थळ मिळेल, मात्र ते लेख गैरसमज उत्पन्न करणारे असू नयेत.

५ लेखकांच्या मतांची व ते प्रसिध्द करणाऱ्यांच्या मतांची एकवाक्यता असेलच असा नियम नाही.

६ प्रस्तुत सदर पुस्तकाची पृष्ठे बत्तीस आहेत; परंतु विषयाच्या महत्वाच्या मानाने ती प्रसंगी वाढविली जातील. चालू अंकाची पृष्ठे अठ्‌ठेचाळीस दिली आहेत.

७ वर्गणी आगाऊच आली पाहिजे.

८ नमुन्यासाठी मागविण्याच्या अंकाची किंमत चार आणे ठेविली आहे.

यानंतर श्री. रामचंद्र बळवंत वैद्य यांनी लिहिलेले मंगलाचरण आहे. ते अर्थातच श्री शंकराला उद्देशून आहे. 'रंगभूमि' हा शब्द त्यात खुबीने गोवलेला आहे.[२]

कृ. प्र. खाडिलकर यांनी प्रस्तावनेत व्यक्त केलेले विचार –

रंगभूमीच्या पहिल्या अंकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत श्री. खाडिलकरांनी, या नियतकालिकाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. या नियतकालिकाच्या स्वरूपाविषयीची चर्चा संपादकांनी त्यांच्याशी केली असावी असे त्यांच्या प्रस्तावनेवरून दिसते. समाजामध्ये नाटक या विषयासंबंधी आस्था निर्माण झाली आहे तिला योग्य वळण लावण्याचे काम या नियतकालिकाने करावे. नाटक या विषयाचा सांगोपांग ऊहापोह करावा. ग्रंथपरीक्षण आणि प्रयोगपरीक्षण दोन्ही प्रकारचे लेख यात यावेत. नाटककार, नट आणि प्रेक्षक या सगळ्यांनाच यातील लेखांचा उपयोग झाला पाहिजे. या मासिक पुस्तकाचे अंतर्बाह्य स्वरूप पाश्चिमात्य रंगभूमीविषयक मासिकांच्या बरोबरीचे होईल अशी आशा प्रस्तावनेत व्यक्त केली आहे.

या पहिल्या अंकात खालीलप्रमाणे मजकूर आलेला दिसतो -

१ नाट्यकलेची उत्पत्ती - नाटकाच्या उत्पत्तीषियी दोन तर्क.
२ नाट्यकलेचे ललितत्व - Drama as fine art. ले. - डॉ. के. व्ही. खरे.
३ पत्रव्यवहार - स.ह.भावे. यात रंगभूमी नियतकालिका संबंधीच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.
४ उत्तररामचरितनाटक - निबंध - ले. गोपाळ वामन बापट.
५ स्फुट विवेचन- नवी नाटके, मुंबईच्या नाटकगृहांचे कायदे, नाट्यसंमेलन.

मुख्य मजकूर संपल्यानंतर जाहिरातीसाठी व्यापारी वर्गाला आवाहन केले असून पत्रव्यवहार, सेक्रेटरी, किर्लोस्कर संगीत मंडळी या नावावर करावा व पुण्यातील वर्गणीदारांनी आपली वर्गणी रंगभूमीची शाखाकचेरी कसबा पेठ, जुनी मंडई येथे भरावी अशा सूचना दिल्या आहेत. पुणे येथे एस. एन. परांजपे यांच्या मनोहर प्रेसमध्ये रंगभूमी नियतकालिक छापल्याचा उल्लेख केला आहे. शेवटच्या पानावर किर्लोस्कर मंडळीत विकत मिळणाऱ्या नाट्यविषयक पुस्तकांची जाहिरात आहे. रंगभूमीची वार्षिक वर्गणी अडीच रुपये आणि किरकोळ अंकाची किंमत चार आणे होती.

रंगभूमी नियतकालिकात संपादकांनी व्यक्त केलेले नाट्यविषयक विचार –

रंगभूमीच्या पहिल्या अंकात संपादकीयामध्ये व्यक्त झालेले विचार या प्रकरणात यापूर्वी दिलेलेच आहेत. पण संपादकांनी पुढच्या अंकामध्येही वेळोवेळी रंगभूमी नियतकालिक काढण्यामागील हेतू, प्रेरणा, या मार्गातील अडचणी याविषयी वारंवार लिहिलेले आहे. नवीन वर्षाच्या प्रारंभी सिंहावलोकन केलेले आहे.स्फुट विवेचन, पत्रव्यवहार इ. सदरांमध्ये काही टीपा आहेत. काही लेखांनंतर संपादकांनी स्वताचे विचार मांडले आहेत. या सगळ्याचा एकत्रित आढावा घेतला की रंगभूमी नियतकालिकाची मूळ बैठक ध्यानात येते. श्री. मुजुमदार हे किर्लोस्कर नाटक मंडळीसारख्या मातब्बर नाट्यसंस्थेचे व्यवस्थापक होते. नाट्यक्षेत्रातला त्यांचा प्रदीर्घ अनुभव, व्यासंग, दूरदृष्टी, नाट्यक्षेत्राच्या सर्वांगीण विकासाची त्यांना असलेली तळमळ यामुळे त्यानी वेळोवेळी व्यक्त केलेले विचार मौलिक आहेत हे ध्यानात येते. रंगभूमीतील विविध सदरांमधून आणि इतरत्र त्यांनी व्यक्त केलेले विचार आपण क्रमाने पाहत गेलो की त्यांच्या मर्मग्राही दृष्टीची साक्ष पटते. रंगभूमी नियतकालिकाच्या विशिष्ट स्वरूपाचेही आकलन होते.

ऑगस्ट १९०७ मध्ये रंगभूमीचा पहिला अंक निघाला. त्यानंतर दुसरा व तिसरा जोड अंक सप्टें-ऑक्टोबरचा अंक म्हणून निघाला आहे. त्या अंकात ‘स्वत:विषयी’ या शीर्षकाखाली संपादकांनी सुरूवातीला (पृ. १ते ४) काही विचार मांडले आहेत. रंगूमीचे अंक नियमितपणे काढण्याचा संकल्प होता पण मासिकाचा जन्म आणि पुणे शहरातील वार्षिक साथ[३] यांची वेळ एकच आल्याने पुणेकरांबरोबर रंगूमीलाही जागा बदलावी लागली. या नियतकालिकाची किंमत थोडीशी जबर आहे अशी अनेकांची सूचना आली आहे असे सांगून संपादक म्हणतात, ‘पायकाटाईपाचे, ४८ पृष्ठांचे व महिन्यास एक किंवा दोन चित्रे देणारे मासिक पुस्तक वर्षाचे शेवटी २॥ रुपयात पाचशे साडे पाचशे पृष्ठांचा ग्रंथ व निदान बारा-पंधरा चित्रे देणारे आहे हे लक्षात ठेवावे.’ रंगभूमी मासिकाचा उद्देश नाट्यकलाविषयक गोष्टींचे ज्ञान सर्वत्र करून देता यावे हा आहे. नाटकमंडळी गावोगाव फिरत असल्यामुळे सर्व प्रकारच्या प्रेक्षकांचे निरीक्षण त्यांना करता येते. प्रेक्षकातील गुणदोष त्यांचा व्यासंग व व्यवसाय यावर अवलंबून असतात.

रंगभभूमी नियतकालिकाला कोणकोणत्या अडचणींना सुरुवातीपासून सामोरे जावे लागले ते या निवेदनावरून लक्षात येते. रंगभूमीकारांना या नियतकालिकाची कचेरी सतत फिरती ठेवावी लागली त्यातले एक कारण इथे सांगितले आहे. स्वत: संपादक हे एका प्रथितयश नाटकमंडळीचे व्यवस्थापक असल्यामुळे तत्कालीन नाट्यविषयक अभिरूची, वातावरण कसे होते हे, सतत हिंडत असल्यामुळे त्यांनी चांगले जाणले होते. रंगभूमी नियतकालिकाचे स्वरूप ठरविण्यास त्या अनुभवाचा, निरीक्षणाचा चांगला फायदा झाला आहे.

याच अंकातील 'स्फुट विवेचन' या सदरात 'नाटकात राजद्रोह' यावर एक स्फुट आहे. पानिपतचा मोबदला, शिवाजी, स्वदेशी, राष्टेध्दार इ. नाटकांवर सरकारची वक्र दृष्टी जाऊन त्यावर बंदीहुकुम आणला त्याबाबत संपादक म्हणतात की ऐनवेळी अशी बंदी आणण्यापेक्षा एकदमच सरकारने, कोणती नाटके किंवा त्यातील भाग नको, तो जाहीर करावा. संपादकांच्या या विचारात त्यांची व्यावसायिक दूरदृष्टी दिसते. एखाद्या नाटकाचा प्रयोग एखाद्या नाटकमंडळीने परिश्रम घेऊन बसविल्यानंतर ऐनवेळी सरकारने बंदी आणली की नाटकधंद्यावर त्याचा परिणाम होणारच म्हणून सेन्सॉर बोर्डाची कल्पना येथे सूचित केली आहे. म्हणजे निदान नाटक एकदा पास केले की मागाहून तरी अडचण येणार नाही. त्या काळातील राजकीय वातावरण लक्षात घेतले तर ही सूचना व्यवहार्य होती असे म्हणावेसे वाटते.

रंगभूमी वर्ष १ ले डिसें. १९०७ व जाने. १९०८ अंक ५ वा व ६ वा मध्ये पृ. २५ ते ३२ वर 'स्फुटविवेचन' हे सदर आहे. यात पृ. ३१ वर नाटकमंडळीतील घडामोडी दिल्या आहेत. महाराष्ट-नाटकमंडळीने मुंबईच्या पाठारेप्रभु हेल्थ कँपसाठी व मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इमारत फंडासाठी आपल्या एकेका प्रयोगाचे उत्पन्न दिल्याचा उल्लेख करून संपादकांनी आपला अभिप्राय दिला आहे की अशा रीतीने सुशिक्षित समाज आणि नाटकमंडळ्या यांची देवघेव झाली पाहिजे.

तत्कालीन समाजाचा नट, नाटकमंडळ्या यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन ध्यानात घेतला की या अभिप्रायाचे महत्त्व कळते. अशिक्षित, संस्कारशून्य नट आणि समाजातील सुशिक्षित, विचारी माणसे यांचा संर्पक वाढला तर समाजाचा नाट्यव्यवसायाकडे

पौण्याचा दृष्टिकोन बदलेल, नटवर्गालाही आपल्या उणीवांची जाणीव होईल. यातून नाट्यविषयक वातावरण निरोगी होण्यास मदत होईल ही ती दृष्टी आहे आणि ती स्पृहणीय आहे.

नाट्यविषयक अभिरुची जोपासणे हा जो रंगभूमी नियतकालिकाचा हेतू होता त्या संर्दभात एक उणीव संपादकाना जाणवली आणि ती त्यांनी पहिल्या वर्षाच्या सातव्या अंकात (फेब्रु. १९०८ पृ. १ ते ५) व्यक्त केली आहे. स्त्रीप्रेक्षकांमध्ये नाटकविषयक गोष्टींची जाहीरपणे चर्चा करणारा वर्ग अजून तयार झाला नाही ही गोष्ट संपादकांना आपल्या रसिकतेस कमीपणा आणणारी वाटली आहे म्हणून ‘कुलस्त्रियांचे लेख’ या शीर्षकाखाली ‘ज्ञानप्रकाश’ च्या अंकातील एका स्त्रीचा लेख रंगभूमीत छापला आहे. स्त्रियांविषयीचा हा दृष्टिकोन काळाच्या तुलनेने औदार्याचा आहे हे स्पष्ट आहे. ज्या ज्या गोष्टींमुळे नाट्यक्षेत्र प्रगत होईल त्या सगळ्या गोष्टींकडे संपादकांनी लक्ष पुरविलेले दिसते. रंगभूमी आणि स्त्रिया या संदर्भातील वेगवेगळ्या प्रश्नांच्या चर्चेला रंगभूमी नियतकालिकाने पुढेही व्यासपीठ उपलब्ध करून दिले यामागे संपादकांचे विशिष्ट धोरणच आहे.

नाटकमंडळ्यांमधील फाटाफूट हा रंगभूमीकारांच्या सततच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय असलेला दिसतो. याच अंकात त्यांनी केलेली उपरोधिक टीका वाचावयास मिळते. ‘स्फुट-विचार’ मध्ये (रंगभूमी - वर्ष १ ले, फेब्रु. १९०८, अंक ७, पृ. ६ ते १२) महाराष्ट-संगीत मंडळी नव्याने सुरू होऊन लगेच श्रीमहालक्ष्मी प्रासादिक मंडळीशी संलग्न झाल्याचे वृत्त देऊन संपादक उपरोधाने लिहितात ‘ अनेक गंधर्वांचा कळप असूनही असे का व्हावे ?’ नाटक धंद्यातील लोकांना कलेच्या शिक्षणापेक्षा व्यावहारिक शिक्षणाची आवश्यकता आहे असाही शेरा ते मारतात यावरून या व्यवसायातील अस्थिरतेचे एक महत्त्वाचे कारण आणि प्रगतीतला अडथळा स्पष्ट कळतो. याच अंकात ‘स्फुट-विवेचन’ या सदरात स्वदेशहितचिंतक मंडळीतील एका प्रमुख पात्राने[४] ‘ललितकलादर्शक’ नावाची स्वतंत्र नाटकमंडळी काढली त्याबाबत लिहिले आहे. या मुख्य पात्रामुळे आणि कोल्हटकर देवल यांसारखे नाटककार मिळाल्यामुळे स्वदेशहितचिंतक मंडळी बरीचशी नावारूपाला आली होती हे नमुद करून संपादक

म्हणतात, कोणतीही गोष्ट शाश्वतीने चालावयाची नाही असा नाटकधंदयाचा नियम दिसतो.

याच स्फुट विवेचनात, सीताराम गणेश देवधर यांच्या, संगीत सुविचार विजय नाटकावर लिहिताना, नाटकाचा विषय आणि त्याची लोकप्रियता अथवा अप्रियता याबाबत संपादकांनी मार्मिक विचार व्यक्त केले आहेत. विधवाविवाहोत्तेजन हा या नाटकाचा हेतू आहे. पुनर्विवाह या सामाजिक प्रश्नाच्याबाजूने लिहिलेले हे नाटक आहे. या संदर्भात श्री. मुजुमदार लिहितात,[५] 'सर्वसंमत विषयांवर लिहिलेले नाटक गुणांच्या दृष्टीने साधारणतः कमी असले तरी विषयाच्या लोकप्रियतेच्या जोरावर खपले जाते. उलटपक्षी वादग्रस्त विषयावर लिहिलेल्या नाटकातील गुणांबद्दलही वाद उत्पन्न होतात. पहिल्याची वास्तविक योग्यता वाढविण्यात येते, दुसऱ्याला उलट अनुभव येतो' (रंगभूमी वर्ष १ ले, फेब्रु. १९०८, अंक ७ वा, स्फुटविवेचन पृ. ४४) पहिल्या प्रकारचे उदाहरण शारदा, दंडधारी ही नाटके तर दुसऱ्या प्रकारचे उदाहरण मतिविकार. म्हणजे नाटकाचा विषय, समाजमनावर होणारा त्याचा परिणाम आणि नाटकातील गुणावगुण यांचा अन्योन्यसंबंध इथे स्पष्ट केला आहे. अप्रिय विषयावरचे नाटक असेल तर नाटक म्हणून त्याचा दर्जा मोठा असावा लागतो. आपल्या गुणांच्या जोरावर लोकांना त्यांच्या मनाविरूध्द आपल्याकडे ओढून घेता यावे लागते. नाटकासारख्या बेभरवशाच्या धंद्याबाबत हे विचार मननीय वाटतात. नाटक हे समाजसुधारणेचे एक मोठे हत्यार आहे याची जाणीव आपल्याकडे होऊ लागली आहे असे सांगून या परिस्थितीचा सूक्ष्म विचार संपादकांनी मांडला आहे.

याच स्फुटविवेचनात नाटककाराच्या हक्काची पायमल्ली करणे कसे गैर आहे त्यावर लिहिलेले आहे. नाटककाराची परवानगी न घेता प्रयोग करणे, मोबदला न देणे, किंचित नाव बदलून नाटक करणे, एका नाटकमंडळीचे सिद्ध झालेले नाटक दुसऱ्या नाटकमंडळीने बसविणे हे सर्व प्रकार गैर आहेत. यामुळे नवी सरस नाटके नाटककार लिहिणार नाहीत असा इशारा संपादकांनी दिला आहे. पारसी, गुजराती नाटकमंडळ्यांमध्ये एका कंपनीचे नाटक दुसरी कंपनी करत नाही इकडे लक्ष वेधले आहे. नाटककार व नाटकमंडळ्या यांच्या हक्काविषयीची ही जागरूकता, उत्तम नाटकनिर्मिती आणि नाट्यव्यवसाय या दोन्ही संदर्भात महत्त्वाची आहे. नाटककाराला

योग्य तो मान आणि पैसा मिळाला पाहिजे त्याच प्रमाणे नाटकमंडळ्यांनीही एकमेकांचा आब राखला पाहिजे हा विचार महत्त्वाचा आहे. व्यावसायिक नीतिमत्तेची जाण यात दिसते.

दलालांमुळे नाट्यव्यवसायाला हीन स्वरूप आले ही वस्तुस्थिती एका स्फुटविवेचनात (रंगभूमी वर्ष १ ले, मे १९०८, अंक १०, पृ. ४९ ते ५६) मांडली आहे. त्याचठिकाणी टीकाकारांविषयीही लिहिले आहे. एकाच नाटकावर परस्परविरूध्द टोकाच्या टीका होतात. अमेरिकेतील नाटकमंडळ्या यीकाकारांना मुळीच किंमत देत नाहीत असे सांगून आपल्याकडील टीकाकारांच्या वर्गाविषयी असंतोष व्यक्त केला आहे. टीकाकारांविषयीची ओरड आजही आपण ऐकतो. व्यासंग असलेले आणि समतोल दृष्टीचे टीकाकार कोणत्याही काळात कमीच असतात असे या विवेचनावरून अधिक स्पष्ट होते.

रंगभभूमी नियतकालिक सुरू करण्याची कल्पना मुळात कशातून आली त्यासंबंधी संपादकांनी 'नाटकांचे गुणदोष विवेचक मंडळ' (रंगभूमी, वर्ष १ले जून १९०८ अंक ११, पृ.१ ते ८) या आपल्या लेखात सांगितले आहे. परकीय राजवट असल्यामुळे आणि १९०७-८ पासून राजकीय चळवळीला जोर चढल्यामुळे नाटकांवर ब्रिटिश सरकारची वक्रदृष्टी होती. विशिष्ट प्रकारच्या नाटकांवर बंदी आणली जात होती. अशावेळी इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स इ. देशात नाटक या विषयासंबंधी लोकात चर्चा वाढावी म्हणून काय उपाय करण्यात येतात याची आपल्या वाचकांना माहिती द्यावी म्हणून संपादकांनी हा लेख लिहिलेला आहे. युरोपमध्ये आणि इतर बहुतेक देशात नाटकासंबंधी विचार करण्यासाठी सरकारी खात्यातील मंडळी नेमलेली असते.ही मंडळी राजद्रोह बंद करण्याचेच काम फक्त करीत असते. परंतु अमेरिकेत मात्र नैतिक हेतूने इ.स. १८९७ मध्ये प्रो. चार्लस स्प्रेग स्मिथ या गृहस्थाने People's Institute नावाची एक लोकसभा स्थापन केली. या लोकसभेने आपल्या कामाचा व्याप किती विस्तृत केला, त्यामुळे नाट्यक्षेत्राचे कोणते फायदे झाले याची सविस्तर माहिती श्री. मुजुमदार यानी दिली आहे. आपल्याकडे अशा तऱ्हेची गुणदोष विवेचक संस्था नाही. लोकांची सद्भिरुची वृध्दिंगत करणारी किंवा प्रेक्षकाची गुणग्राहकता वाढविणारी साधनेही नाहीत याकडे लक्ष वेधून किर्लोस्कर मंडळीने तीन वर्षापूर्वी (म्हणजे १९०५ मध्ये) अशा धर्तीचा प्रयत्न केला होता त्याची माहिती दिली आहे. या प्रयत्नाला खूप मोठे यश आले नाही पण

बऱ्याच मार्मिक प्रेक्षकांकडून नाटक या विषयाची चर्चा केली गेली आणि या चर्चेनेच 'रंगभूमी' नियतकालिक काढण्याची कल्पना मनात रुजविली. म्हणजे रंगभूमी नियतकालिकाच्या जन्मापूर्वीपासून किर्लोस्कर नाटकमंडळी आणि श्री. मुजुमदार हे नाट्यक्षेत्राच्या प्रगतीसाठी विविध प्रकारे धडपडत होते. इतर देशात याबाबत काय चालू आहे इकडेही त्यांचे लक्ष होते हे दिसून येते. किर्लोस्कर नाटकमंडळीशी संपादकांचा असलेला घनिष्ट संबंध त्यांच्या, रंगभूमी नियतकालिकाच्या संदर्भातील कार्याला फार मोठा उपकारक ठरला आहे.

जुलै १९०८ मध्ये रंगूमी नियतकालिकाला एक वर्ष पुरे झाले. वर्ष २ रे १९०८ अंक १ मधील स्फुट विवेचनात (पृ. १ ते ८) वर्षारंभाच्या निमित्ताने काही विचार संपादकांनी व्यक्त केले आहेत. त्यात प्रामुख्याने दोन गोष्टींचा उल्लेख आहे. वर्गणीदार हेच या नियतकालिकाचे आश्रयदाते आहेत हे त्यांनी लक्षात घेऊन सहकार्य करावे अशी इच्छा व्यक्त केली आहे.रंगभूमी नियतकालिकापूर्वी जी वृत्तपत्रे आणि मासिके चालू झालेली होती त्यांच्याकडून रंगभूमिकारांनी सहकार्याची, प्रोत्साहनाची अपेक्षा केली होती पण ती पुरी झाली नाही ही वस्तुथिती मांडली आहे.

नाटयकलेकडे पाहाण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलावा म्हणून अनेक विचारी आणि या कलेबद्दल प्रेम असणारी माणसे त्याकाळी प्रयत्न करीत होती. त्यापैकी श्री. अनंत वामन बरवे हे एक होते. वाईला, काशिनाथशास्त्री लेले यांच्या अध्यक्षतेखाली श्री. बरवे यांचे व्याख्यान झाले त्यावेळी अध्यक्षांनी नाटक मंडळ्यांवर दिशाहीन टीका केली. त्यासंबंधीची नापसंती संपादकांनी व्यक्त केली आहे.(रंगभूमी, वर्ष २ रे डिसेंबर/ जानेवारी/ फेब्रुवारी १९०९ अंक ५-६-७ स्फुट विवेचन पृ. ९ ते २८)प्रत्येक कला, व्यवसाय यात चांगल्या-वाईट गोष्टी असणारच. अपप्रवृत्ती आहेत म्हणून ती कला, किंवा व्यवसाय वाईट ठरत नाही. वाईट गोष्टी दूर करून उन्नतीकडे लक्ष वळवणे श्रेयस्कर आहे हा चिरस्थायी स्वरूपाचा विचार येथे मांडला आहे. श्री. बरवे यांच्या कार्याचा गौरवही केला आहे. त्याचबरोबर नटांच्या तोंडचे अपशब्द, त्यांना असलेली नाटक मंडळ्यांच्या मालकीची हाव यावर उपरोधपूर्ण भाषेत टीकाही या स्फुट विवेचनात वाचावयास मिळते. किर्लोस्कर नाटक मंडळीचे मुंबई, सोलापूर, विजापूर, बागलकोट येथे नाट्यप्रयोग झाले त्यावेळचे अनुभव, त्या शहरांमधील परिस्थिती, प्रेक्षकांचे वर्तन,

अभिरूची इ. बद्दल लिहिले आहे.मुंबईत, दक्षिणी लोकांच्या मालकीचे नाट्यगृह नाही ते व्हायला हवे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. श्री. मुजुमदार यांची नजर किती चौफेर होती हे या सर्व विवेचनावरून दिसते. नाटकाशी संबंधित प्रत्येक विषयाचे महत्त्व त्यांनी अचूक जाणले आहे. याच स्फुटविवेचनात ‘भस्मासुराचा राजद्रोह’ या शीर्षकाखाली, उपरोधपूर्णशैलीत टीका केलेली आहे.इंदूर संस्थानांतून माधवराव पाटणकर यांच्या नाटकमंडळीची हद्दपारी झाली. पुराणातील भस्मासुराच्या कथानकात संस्थानी अधिकाऱ्यांना राजद्रोह दिसला या प्रकारावर केलेली ही कडक टीका आहे. रंगभूमी नियतकालिकाबाबत वर्गणीदारांची अनास्था, नटांचे वर्तन, नाटकांवर बंदी अशा अनेक विषयांवर लिहिताना श्री. मुजुमदार यांनी वक्रोक्ती, उपरोध यांचा वापर केलेला दिसतो. नाटक या विषयाच्या संदर्भातील कोणत्याही वाईट गोष्टीवर लिहिताना त्यांच्या लेखणीला धार चढलेली दिसते.किर्लोस्कर नाटक मंडळीच्या नाटकांवर त्यावेळच्या वृत्तपत्रात आलेले चांगले आणि वाईट असे दोन्ही अभिप्राय संपादकांनी रंगभूमीत छापलेले आहेत. ‘इंदुप्रकाश’ च्या २५-११-१९०८ व १५-१२-१९०८ अशा अंकांमध्ये परस्परविरोधी अभिप्राय व्यक्त करणारी प्रेक्षकांची पत्रे आली होती ती रंगभूमीच्या वाचकांसाठी मुद्दाम छापली आहेत. ‘डेक्कन कॉलेज’ या त्रैमासिकात, डेक्कन कॉलेजमधील विद्यार्थी रामचंद्र गोविंद दंडवते यांनी आधुनिक नाट्यकलेबद्दल काही विचार व्यक्त केले होते. (‘डेक्कन कॉलेज’ फेब्रु. १९००८) ते संपादकांनी रंगभूमीसाठी मुद्दाम पुन्हा घेतले आहेत. (रंगभूमी, वर्ष २रे, मार्च-एप्रिल-मे १९०९ अंक ८/९/१०, स्फुट विवेचन पृ. २९ ते ३६). नाटकाबद्दल जिथे जिथे काही विचार, चर्चा होत असेल त्याची अत्यंत निष्ठेने दखल घेऊन रंगभूमिकारांनी या विषयाबद्दलची आपली कळकळ व्यक्त केली आहे. याच अंकात भारत नाट्य समाजाच्या पाचव्या संमेलनाचा वृत्तांत दिला आहे. (पृ. १ ते ३६). या संमेलनात श्री. मुजुमदार यांनी न्यूयॉर्कच्या People's Institute सारखी संस्था पुण्यात निघावी. निवडक मंडळींनी नाटके पाहून लोकांना शिफारस करावी अशी सूचना केल्याचे वृत्त दिले आहे. श्री. मुजुमदार यांच्या मनावर या कल्पनेचा बराच प्रभाव पडला होता असे दिसते परंतु ती कल्पना प्रत्यक्षात मात्र आली नाही.

रंगभूमीच्या दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या अंकात (ऑगस्ट १९०८) सिंहावलोकन करताना संपादकांनी वर्गणीदारांवर असलेल्या जबाबदारीची जाणीव करून दिली होती. दुसऱ्या

वर्षाच्या शेवटच्या अंकात (रंगभूमी, जून/जुलै १९०९ अंक ११/१२ सिंहावलोकन पृष्ठ १ ते १२) संपादक लिहितात, --'प्रस्तुत मासिक पुस्तकात मनोरंजक विषय फारच थोडे आहेत ..... विचारपूर्वक लिहिले जाणारे विषय सामान्यत: सामान्य वाचकांना कंटाळवाणे असतात व रंगभूमीत याच विषयांची संख्या अधिक असल्यामुळे या पुस्तकाला दोन वर्षातही वाचक जितके मिळावेत तितके मिळालेले नाहीत. तथापि आम्ही निराश न होतां, मासिक पुस्तक नुकसान सोसून चालविण्याचा संकल्प केला आहे तो कायम आहे. कारण नाटक विषयाची स्वतंत्रपणे चर्चा करण्याची इच्छा आमच्याशिवाय इतर वृत्तपत्रे व मासिक पुस्तकें यापैकी फारच थोड्यांस असेल ... नाटक ग्रंथापेक्षा व नाटकविषयक पुस्तकांपेक्षा त्याचे टीकाकारच अधिक जन्मास येतात. ही स्थिति नाहीशी व्हावी म्हणून रंगभूमीचा जन्म आहे व हे आत्मकार्य (Self imposed task) समजून आम्ही दोन वर्षे तर आपल्या हिंमतीवर निभावून नेली आहेत.'